# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

## कोव्हिड–१९ प्रतिबंध अंतर्गत कंत्राटी भरती जाहिरात

### —: थेट मुलाखत (Walk in Interview) :—

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना कोविड चाचणीची सेवा देणेकामी महापालिकेमार्फत सुरु करण्यात येणाऱ्या आरटीपीसीआर. प्रयोगशाळेकरीता मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे पदांवर साथरोग कालावधीसाठी पात्र उमेदवारांची निव्वळ तात्पुरत्या/अस्थायी स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेकामी **दि.३०/९/२०२१ रोजी** थेट मुलाखती आयोजित करण्यांत आलेल्या आहेत.

| Sr. No. | Name of Post | Qualification | No.of Posts | Reservation | Salary (Per Month) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Micro Biologist | MD Micro / MD Path | 1 | OPEN-1. | Rs.85000/- |
| 2 | Centre Head cum Quality Manager | M.Sc./ B.Sc. (Microbiology), 1 year experience of Managing RTPCR Lab. | 1 | OPEN-1. | Rs.35000/- |
| 3 | Sr.Technician | B.Sc., DMLT, 1 year experience of working in RTPCR Lab. | 12 | OPEN-5, SC-2, ST-1, VJ(A)-1, OBC-2, EWS-1. | Rs.30000/- |
| 4 | Jr.Technician | B.Sc., DMLT. | 12 | OPEN-5, SC-2, ST-1, VJ(A)-1, OBC-2, EWS-1. | Rs.22500/- |

**(अ) मुलाखतीचे ठिकाण** :— आयुक्त कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका,प्रशासकीय इमारत दुसरा मजला, शंकरराव चौक, कल्याण (प.)

**(ब) थेट मुलाखतीचा दिनांक** :— **दि.३०/९/२०२१ (गुरुवार)**

**(क) उमेदवारांची नोंदणी आणि मुळ कागदपत्रे छाननी व तपासणी.** :— सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत.

**(ड) थेट मुलाखतीची वेळ** :— दुपारी २.०० ते सायंकाळी ५.३० या वेळेत पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.

**( टिप :— रिक्त पदसंख्येपेक्षा कमी पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यास आवश्यकता विचारात घेवून मुलाखती न घेता नियुक्ती देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, तसेच आरक्षणनिहाय उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षित पदासाठी इतर प्रवर्गातील उमेदवाराचा विचार करण्यात येईल)**

**अटी व शर्ती :—**

**(१) वयोमर्यादा** :— मुलाखतीचे दिवशी उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे आणि कमाल वय खुला प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील.

**(२)** सदरची नियुक्ती ही कंत्राटी पध्दतीने पूर्णपणे तात्पुरत्या/अस्थायी स्वरुपाची व कोव्हिड–१९ साथरोग कालावधीसाठी आहे. साथरोगाचा प्रादूर्भाव संपल्यानंतर त्यांची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल. त्यापुढे त्यांना कल्याण डोंबिवली महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याबाबत किंवा भविष्यात कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क राहणार नाही.

**(३)** उमेदवारांनी संपूर्ण नांव, पत्रव्यवहाराचा पूर्ण स्पष्ट पत्ता, भ्रमणध्वनी/दुरध्वनी क्रमांक, मेल आयडी, जन्मतारीख, वय, धारण शैक्षणिक अर्हता, नोंदणी प्रमाणपत्र, अनुभव इत्यादी तपशिल कॉलमनिहाय स्पष्ट व स्वच्छ अक्षरातील अथवा टंकलिखित स्वरुपातील अर्ज प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळेस सादर करावयाचा आहे. (सोबत अर्जाचा नमुना जोडला आहे.) तसेच मुलाखतीस येताना उमेदवाराने त्याचे शैक्षणिक अर्हता, जात प्रमाणपत्र/वैधता प्रमाणपत्र, जन्मतारखेचे प्रमाणपत्र, महाराष्ट्र मेडीकल कौन्सीलकडे नोंदणी केल्याचे सद्यस्थितीत वैध (valid) असलेले प्रमाणपत्र, अनुभवाचे प्रमाणपत्र इत्यादी मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. तसेच त्यांचा एक संच झेरॉक्स प्रतीचा अर्जासोबत जोडावा.

**(४)** अर्जदार मागासवर्गीय असल्यास जातीचा स्पष्ट उल्लेख करुन कोणत्या प्रवर्गात मोडत आहे याचा उल्लेख करावा. अर्जदार विवाहीत महिला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र/नावात बदल केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करुन तसा अर्जात स्पष्ट उल्लेख करावा.

(५) थेट मुलाखतीस उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच उमेदवारास नियुक्ती दिल्यास त्याने २ दिवसात कामावर हजर होणे आवश्यक आहे.

(६) नियुक्तीनंतर सेवा सोडणेसंदर्भात एक महिना पुर्वसूचना न देता परस्पर सेवा सोडून गेल्यास मानधन कपात करण्यात येईल.

(७) वेळोवेळी लागू करण्यांत येणाऱ्या इतर अटी/शर्ती संबंधितांना लागू राहतील. तसेच उमेदवाराचे काम समाधानकारक नसल्यास कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांची सेवा समाप्त करण्यात येईल.

(८) जाहिरातीस प्रतिसाद कमी असल्यास आवश्यकता विचारात घेवून अटी शिथिल करण्याचा अधिकार आयुक्त,क.डों.म.पा., कल्याण यांना राहील. तसेच जाहिरातीमधील पदसंख्या, आरक्षण, मुलाखतीचे ठिकाण, दिनांक, वेळ इत्यादीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करणे अथवा सदरहू जाहिरात कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, क.डों.म.पा., कल्याण यांना राहतील.

( मा.आयुक्त महोदया यांचे मान्यतेने )

आयुक्त 22/09/2021

कल्याण डोंबिवली महानगरपालिका

करीता